Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 313 – 317
DOI: 10.5281/zenodo.10125484

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे स्त्री विषयक विचार

प्रा. डॉ. मंगल पांडुरंग खेडेकर

विभाग प्रमुख, मराठी विभाग, उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महाविद्यालय रिसोड, जिल्हा वाशिम ४४४५०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: mangalkhedekar96@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

साधी राहणी उच्च विचारसरणी असे जीवन विषयक तत्त्व असणारे,नैतिकता हा जीवनाचा मुलाधार मानणारे, अहिंसा धर्माचे प्रवर्तक व मानवतेची पुजारी तसेच श्रेष्ठ तत्त्वचिंतक व समाज सुधारक म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधी होय.राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी सामान्य माणसाला आदर्श जीवन जगता यावे याकरिता सत्य अहिंसा सत्याग्रह सर्वधर्मसमभाव ही तत्वे जगाला दिली त्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी हाच त्यांचा उदात्त हेतू होता.महात्मा गांधीजींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. स्वतःदेखील याच तत्त्वांनुसार जगले आणि इतरांनीही तसे करावे असे सुचवले. त्यांनी खेड्यांना खऱ्या भारताचे मूळ म्हणून पाहिले आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला. त्यांच्या शेवटच्या वर्षांमध्ये भारत - पाकिस्तान फाळणीमुळे व्यथित झालेल्या गांधींनी हिंदू-मुस्लिम दंगे थांबवण्यासाठी प्रयत्न केले. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधले, असे म्हणतात. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते.२ ऑक्टोबर हा महात्मा गांधींचा जन्मदिवस हा भारतात गांधी जयंती म्हणून आणि जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून साजरा केला जातो.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे दुय्यमस्त्रोतावर आधारित असून त्यामध्ये प्रकाशित अप्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, विविध संदर्भ ग्रंथ इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे

**संशोधन विषयाची उद्दिष्टे**

१. महात्मा गांधीजींचे स्त्रीविषयक विचार अभ्यासणे
२. गांधीजींच्या चळवळीमधील स्त्रियांचा सहभाग अभ्यासणे
३. गांधीजींच्या स्त्री विषयक विचारांची उपयुक्तता अभ्यासणे

**महात्मा गांधीजींचे स्त्री विषयक विचार**

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात समाजामध्ये महिलांना सन्मान मिळावा म्हणून गांधीजींनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. तत्कालीन वृत्तपत्रात व साहित्यात महिला सक्षमीकरण संदर्भात गांधीजींच्या विचार व कार्याचे उल्लेख सापडतात. गांधीजींच्या मते,कोणतेही समाजाचा अथवा राष्ट्राचा विकास महिलांच्या सहकार्याशिवाय शक्य नाही. नारी ही ईश्वराची सर्वात मोठी देणगी आहे. समाजामध्ये महिलांना समान हक्क आहे तो त्यांना मिळाला पाहिजे परंतु आजपर्यंत पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने रूढी परंपरांमध्ये स्त्रियांना अडकविले आहे.

समाजामध्ये स्त्रियांचा सन्मान व्हावा, त्यांचा सामाजिक स्तर उंचवावा असा गांधीजींचा प्रामाणिक प्रयत्न होता. बालविवाह, हुंडा पद्धती, पडदा पद्धती, विधवा विवाह मनाई यासारख्या सामाजिक कुप्रथामुळे स्त्रियांच्या वाटेला दुःख आले आहे.बालपणी मुलींचे लग्न करून त्यांच्यावर वैधव्य लागणे हा घोर अपराध आहे. जितका विधुर पुरुषांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार आहे तितकाच विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार असला पाहिजे असे गांधीजींचे मत होते. गांधीजींनी पडदा प्रथेला देखील विरोध केला आहे. ते म्हणतात स्त्रियांना पतिव्रता म्हणून पडद्यात ठेवणे अयोग्य आहे. स्त्रियांचे रक्षण पडदा पद्धतीने शक्य नाही.

गांधीजींनी हुंडा पद्धतीला एक दुष्ट व्यवहार मानले. शिक्षण ही प्रत्येक समाजातील एक मूलभूत प्रक्रिया मानली जाते मानवाच्या सामाजिक जीवनाच्या सुरुवातीच्या काळापासून ती सुरू होते आणि आयुष्यभर ती सातत्याने चालूच राहते. म्हणूनच शिक्षण हे आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे असे गांधीजी म्हणतात. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास शिक्षणाने होत असतो "माणसाच्या शारीरिक मानसिक व आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय" अशी व्याख्या महात्मा गांधींनी शिक्षणाची केली आहे. महात्मा गांधी शिक्षणाला व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचे साधन मानत होते.

देशाच्या प्रगतीसाठी गांधीजींनी ग्राम महत्त्वाचे मानले. ग्राम सुधारणा करावयाची असेल तर लोकांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे गांधीजींना वाटत होते म्हणून प्रत्येक गावामध्ये शिक्षणाची व्यवस्था असलीच पाहिजेत यावर त्यांचा विशेष भर होता. मातृभाषेतून शिक्षण देण्यास यावे यावर महात्मा गांधीजींचा जोर होता. त्याला व्यवहार ज्ञानही प्राप्त व्हावी असे त्यांना वाटत होते. जीवन सुंदर करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात यावे आणि शिक्षणाद्वारे गाव आदर्श करून आपले जीवन सुंदर बनले पाहिजेत असे गांधीजींचे मत होते. महात्मा गांधीजींची मूल्य शिक्षणाला अधिक महत्त्व दिले.

शिक्षण व शिक्षणाच्या माध्यमातून समाजात चांगले परिवर्तन घडवून आणता येईल असा गांधीजींना विश्वास होता. गांधीजींनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व विशद करताना ते म्हणतात की मुलाला शिक्षण देणे म्हणजे एका व्यक्तीला शिक्षित करण्यासारखी आहे परंतु मुलीला शिक्षण देणे म्हणजे दोन कुटुंबाला शिक्षण देणे इतपत महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय आंदोलनात महिलांचा सहभाग वाढवून त्यातून जन आंदोलन उभारता येईल यावर गांधीजींचा विश्वास होता तसेच महिलांमध्ये आत्मविश्वास व अस्मिता जागृत करण्याच्या उद्देशाने गांधीजींनी महीलांच्या सार्वजनिक बैठका घेतल्या.

गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन सरोजिनी नायडू, सुशीला नायर ,सुचिता कृपाल, आणि विजयालक्ष्मी पंडित, अरुन असफ अली,इंदिरा गांधी अशा काही महिला नेत्यांनी या देशाला मजबूत बनवण्याचे कार्य केले. गांधीजींनी

सार्वजनिक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविण्याचे मौलिक कार्य केले तसेच राष्ट्रीय आंदोलनाच्या विविध टप्प्यात महिलांना मोठ्या संख्येने सहभागी करून घेतले. सविनय कायदेभंग आंदोलनास कस्तुरबा गांधी यांचाही समावेश केला होता , मिठाच्या सत्याग्रहात गुजरातच्या धारासनामध्ये सरोजनी नायडू यांना नेतृत्वाची संधी दिली होती.

गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहाच्या उद्घाटनासाठी स्त्रियांना येण्याचे आवाहन केले. परिणामतः सर्व स्त्रियांनी गरीब श्रीमंत तरुण व म्हाताऱ्या यांनी सत्याग्रहात निर्भयपणे पुढाकार घेतला. स्त्रियावर सशक्त व लाठीधारी पोलिसांनी गराडा टाकला तरीही न घाबरता खंबीरपणे सर्व स्त्रिया पुढे सरसावल्या व त्यांनी मिठाच्या कायद्याचा भंग गेला. ही प्रक्रिया सर्व देशभर घडली.विविध भागातून स्त्रिया मिठाच्या सत्याग्रहात सहभागी झाल्या यातूनच पुढे सर्व चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढू लागला तसेच इतर राष्ट्रीय कार्यामध्ये सुद्धा स्त्रिया सहभागी होऊ लागल्या. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि स्वयंपूर्णतेची जाणीव निर्माण झाली. यावर महर्षी कर्वे म्हणतात की, मी काही दशकात स्त्रियांसाठी जे काही करू शकलो नाही ते महात्मा गांधींनी कृतीशील कल्पनेने करून दाखविले. कमलादेवी चटोपाध्याय मिठाच्या सत्याग्रहाच्या संदर्भात म्हणतात की, या सत्याग्रहात स्त्रियांनी काय केले यापेक्षा या सत्याग्रही चळवळीने स्त्रियांना काय दिले हे महत्त्वाचे आहे. मिठाच्या सत्याग्रहामधून गांधीजींनी स्त्रियांमध्ये पूर्ण परिवर्तन घडवून आणले.

स्त्रियांना एक नवी प्रतिष्ठा लाभली आहे. त्यांना नव्या जबाबदारीची जाणीव झाली आहे.गांधीजी म्हणतात माझ्यात जे काही चांगले असेल ते सर्व मला माझ्या आईकडून मिळाले आहे असे मी मानतो. मी स्त्रीच्या जन्मात जन्माला आलो असतो तर पुरुषांशी बंड पुकारले असते. स्त्रीच्या हृदयात सहज प्रवेश मिळावा म्हणून मी मनाने स्त्रीच बनलो आहे.आपल्या पत्नीचे ऋण अनेक ठिकाणी त्यांनी मान्य केले आहे. स्त्रियांना स्वातंत्र्य न दिल्याने भारतीय समाज मागे पडला आहे असे त्यांचे मत होते. भारताला आर्थिक आणि नैतिक पाठबळ स्त्री देऊ शकते असा त्यांचा विश्वास होता परंतु त्यासाठी जीवनातील प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान स्त्रीला दिले पाहिजे. त्यामुळे स्त्री सर्व बंधनातून मुक्त होईल व राष्ट्र निर्मानाचे कार्य करील.

गांधीजींच्या मते स्त्री-पुरुष समान आहेत.परंतु समाजात जी कृत्रिम असमानता निर्माण झाली आहे ती दूर करण्यासाठी पुरुषांनी स्त्रियांना सहकार्य केले पाहिजे. तर स्त्री पुरुष समानता निर्माण होईल. त्यांच्या मते पुरुष शेवटी स्त्री पासूनच निर्माण होतो याची जाणीव पुरुषाने ठेवली पाहिजे. पुरुषाने स्त्रीबद्दल अधिक सहानुभूती उदारतावादी दृष्टिकोन बाळगला पाहिजे.स्त्रियांना सर्व प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. तिच्यात जागृती निर्माण केली पाहिजे तर स्त्री सबळ होईल असे ते मानित होते. गांधीजीचे स्त्री शिक्षण ,आर्थिक स्वावलंबन, संपत्ती,वारसा संबंधी विचार आजच्या परिस्थितीत देखील उपयोगी पडणारे आहेत.

महिला सबलीकरणाची कुटुंबासाठी,समाजासाठी, राष्ट्रासाठी व जगासाठी अत्यंत आवश्यकता आहे. परंतु सगळीकडे आज स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो .प्रत्येक क्षेत्रात तिच्यावर अत्याचार होत आहेत. भारतीय राज्यघटनेची कलम 16 नुसार समतेची तरतूद करण्यात आली आहे. तरीही स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित झाली नाही. 73 आणि 74 व्या घटनादुरुस्तीने महिलांना पंचायत राज व्यवस्थेत आरक्षण मिळाले परंतु संसदेत मिळत नव्हते ही खेदाची बाब आहे.

अलीकडच्या काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात संसदेत स्त्रियांना आरक्षण पारित झाले आहे परंतु खऱ्या अर्थाने त्याची यशस्वीता ही अंमलबजावणीवर अवलंबून आहे. स्त्रियांची आर्थिक सामाजिक राजकीय क्षेत्रात कायम अनावस्था आहे . गांधीजींना अपेक्षित असे स्त्री सबलीकरण आजही झालेले नाही परंतु स्त्री आबला राहिली नाही हे मात्र नक्कीच. गांधीजींच्या विचाराचे पडसाद स्त्रीच्या विविध विकास रूपाने दिसून येतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात भारतीय स्त्री आत्मविश्वासाने पदार्पण करू लागली. मंत्री, राज्यपाल, आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये भारताची प्रतिनिधी म्हणून

देशाची पंतप्रधान म्हणून देशाचा पहिला नागरिक राष्ट्रपती म्हणून कोणतेही बाबतीत स्त्री पुरुषापेक्षा कमी नाही. ती आबला नाही हे जगाने मान्य केले आहे. त्याचे श्रेय गांधीजींनाच जाते.

हे जरी खरे असले तरी स्त्रियाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात परिवर्तन होण्याची मोठी गरज आहे. आज बऱ्याचदा स्त्रियांना जन्मच नाकारण्यात येत आहे. लिंगभेदाच्या आधारावर स्त्रियांचा जन्मदर घटत आहे. त्यांच्यावर अनेक अत्याचार होत आहेत. या संदर्भात शासन अनेक कायदे करत आहे परंतु जोपर्यंत मानसिकता बदलत नाही तोपर्यंत या सर्व समस्यांचे उच्चाटन होणार नाही. त्याकरिता स्त्री शिक्षण गतिमान करणे, जनजागृती करणे, स्त्रियांना राखीव जागा, रोजगारांची संधी, आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन,राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग या सर्व स्तरावर एकत्रित कार्य करणे काळाची गरज आहे

**निष्कर्ष**

१. स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याचे महत्वपूर्ण कार्य महात्मा गांधीजींनी केले आहे
२. शतकानुशतके घराच्या चार भिंतीत अडकून पडलेली स्त्री खऱ्या अर्थाने गांधीयुगातच मुक्त झाली.
३. महात्मा गांधींनी स्त्री शिक्षणावर महत्त्वपूर्ण भर दिला त्याचाच परिणाम जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्री आत्मविश्वासाने पदार्पण करू लागली
४. महात्मा गांधी हे बोलके सुधारक नव्हते तर करते सुधारक होते.त्यामुळेच त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात कस्तुरबा गांधी यांचाही समावेश केला
५. भारतीय राज्यघटनेच्या कलम 16 नुसार समतेची तरतूद करण्यात आली. हा गांधीजीच्या विचारांचा परिणाम ठरला
६. शिक्षण हे मातृभाषेतूनच असावे यावर महात्मा गांधीजींचा विशेष भर होता. आधुनिक काळात गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता स्पष्ट झाली आहे.
७. शिक्षण हे जीवन उपयोगी व समाजाभिमुख असावे असे महात्मा गांधीजींचे मत होते. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये गांधीजींच्या या विचाराचे प्रतिबिंब आढळून येते.
८. स्त्री शिक्षित झाली तर घरातील सर्वांना शिक्षित करेल म्हणून स्त्री शिक्षणावर महात्मा गांधीजींनी भर दिला. या विचारांचा परिणाम स्वरूप स्त्री शिक्षणाच्या दृष्टिकोनातून विविध योजना शासन स्तरावर राबविल्या जातात
९. महात्मा गांधीजींची मार्गदर्शक तत्वे आदर्श समाज घडविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात
१०. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाकरिता गांधीजींनी सुचविलेले स्त्री सक्षमीकरण विषय विचार महत्वपूर्ण ठरतात

**संदर्भ सूची**

१. महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार - डॉ.बाळ पडवळ, श्री मंगेश प्रकाशन नागपूर

२. आधुनिक भारत - डॉ. श . गो.कोलारकर, श्री मंगेश प्रकाशन नागपूर

३. समाजकार्याची मूलतत्वे - प्रा. पुरुषोत्तम थोटे, विद्या प्रकाशन नागपूर

४. गांधी - नलिनी पंडित, ग्रंथाली प्रकाशन मुंबई

५. गांधीजी - पु.ल.देशपांडे, राजहंस प्रकाशन पुणे

६. गोष्टीरूप महात्मा गांधी - शामकांत कुलकर्णी, विजय प्रकाशन नागपूर

७. भारताचे भाग्यविधाते - डॉ.शांता कोठेकर , साईनाथ प्रकाशन नागपूर

८. भारतीय राजकीय विचारवंत - कृ.ती. बोराळकर, पिंपळापुरे प्रकाशन नागपूर

९. गांधी एक सत्यवादी - डॉ. सहदेव शिंदे, रिया पब्लिकेशन कोल्हापूर

१०. माझ्या स्वप्नातील भारत - मोहनदास करमचंद गांधी, साकेत प्रकाशन पुणे